क्रमांक : ५६७८ / ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १६ मे, २०२४

**:: परिपत्रक ::**

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे विवरणपत्र**

**संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १६१७७/ई-१, दिनांक २ नोव्हेंबर, २०२३.**

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १० जून, २०२४ रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. सोमवार, दिनांक १० जून, २०२४ ते शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरावरील कार्यवाही बाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असून या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे. **त्याअनुषंगाने मंत्रालयीन विभागांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात येत आहे :-**

**(१) महाराष्ट्र विधानपरिषद तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मा.मंत्री महोदयांना नेमून देण्यात आलेले दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये व मंत्रालयीन विभागास नेमून देण्यात आलेले दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविण्यात आले आहेत.**

**(२) या सचिवालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना कळविल्यानुसार तारांकित प्रश्नांची उत्तरे केवळ QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीनेच विहित मुदतीत या सचिवालयाकडे पाठविण्यात यावीत.**

**(३) ज्या विभागास प्रश्न चिन्हांकित करण्यात आला आहे, त्या विभागास असा प्रश्न अन्य विभागास हस्तांतरित करावयाचा असल्यास, विवरणपत्राच्या स्तंभ (५) मध्ये प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक दर्शविण्यात आलेला आहे. उक्त दिनांकानंतर प्रश्न सूचनांच्या हस्तांतरणाची प्रकरणे या सचिवालयास प्राप्त झाल्यास तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक/गट बदलून देता येणे शक्य होणार नाही. अशा स्थितीत त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी नेमून दिलेल्या दिनांकास उत्तर प्राप्त होणे आवश्यक राहील तसेच संबंधित मा.मंत्री महोदयांना सदर तारांकित स्वीकृत प्रश्नाच्या उत्तराकरिता निश्चित केलेल्या मूळ दिवशीच सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतील.**

**तसेच तारांकित स्वीकृत प्रश्न अन्य विभागाकडे हस्तांतरीत होत असल्यास, विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या ऑनलाईन हस्तांतरणाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत सदर प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाची QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे कार्यवाही पूर्ण करावी व प्रश्नाच्या हस्तांतरणाच्या पत्राची एक प्रत विधानपरिषद प्रश्न ("ई-१") कक्षास अग्रेषित करुन कक्षाच्या e1.qust.mls@gmail.com या ई-मेलवर देखील पाठविण्याची सर्व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी.**

धजगताप

**(धनश्री जगताप)**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

(१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
(२) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
(३) मा.मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तृतीय (पावसाळी) अधिवेशन, २०२४

## तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक, विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक तसेच प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर येण्याचा वार व दिनांक (४) | प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा वार व दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| एक | (१) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री<br>(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री<br>(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(४) कामगार मंत्री<br>(५) उद्योग मंत्री<br>(६) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(७) महिला व बालविकास मंत्री<br>(८) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री<br>(९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री | सोमवार, दिनांक १० जून, २०२४<br>सोमवार, दिनांक २४ जून, २०२४<br>*सोमवार, दिनांक ०१ जुलै, २०२४ | शुक्रवार, दिनांक ३१ मे, २०२४<br>शुक्रवार, दिनांक १४ जून, २०२४<br>*शुक्रवार, दिनांक २१ जून, २०२४ | मंगळवार, दिनांक २८ मे, २०२४<br>मंगळवार, दिनांक ११ जून, २०२४<br>*मंगळवार, दिनांक १८ जून, २०२४ |
| दोन | (१) सहकार मंत्री<br>(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री<br>(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) कृषी मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री<br>(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री | मंगळवार, दिनांक ११ जून, २०२४<br>मंगळवार, दिनांक १८ जून, २०२४<br>मंगळवार, दिनांक २५ जून, २०२४<br>*मंगळवार, दिनांक ०२ जुलै, २०२४ | सोमवार, दिनांक ३ जून, २०२४<br>शुक्रवार, दिनांक ७ जून, २०२४<br>शुक्रवार, दिनांक १४ जून, २०२४<br>*सोमवार, दिनांक २४ जून, २०२४ | बुधवार, दिनांक २९ मे, २०२४<br>मंगळवार, दिनांक ४ जून, २०२४<br>मंगळवार, दिनांक ११ जून, २०२४<br>*बुधवार, दिनांक १९ जून, २०२४ |

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री (२) | | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर येण्याचा वार व दिनांक (४) | प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा वार व दिनांक (५) |
|---|---|---|---|---|---|
| तीन | मुख्यमंत्री | } | बुधवार, दिनांक १२ जून, २०२४<br>बुधवार, दिनांक १९ जून, २०२४<br>बुधवार, दिनांक २६ जून, २०२४<br>*बुधवार, दिनांक ०३ जुलै, २०२४ | मंगळवार, दिनांक ०४ जून, २०२४<br>सोमवार, दिनांक १० जून, २०२४<br>मंगळवार, दिनांक १८ जून, २०२४<br>*मंगळवार, दिनांक २५ जून, २०२४ | गुरुवार, दिनांक ३० मे, २०२४<br>बुधवार, दिनांक ०५ जून, २०२४<br>बुधवार, दिनांक १२ जून, २०२४<br>*गुरुवार, दिनांक २० जून, २०२४ |
| चार | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) मृद व जलसंधारण मंत्री<br>(३) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री<br>(४) राज्य उत्पादन शुल्क मंत्री | } | गुरुवार, दिनांक १३ जून, २०२४<br>गुरुवार, दिनांक २० जून, २०२४<br>गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४<br>*गुरुवार, दिनांक ०४ जुलै, २०२४ | बुधवार, दिनांक०५ जून, २०२४<br>मंगळवार, दिनांक ११ जून, २०२४<br>बुधवार, दिनांक १९ जून, २०२४<br>*बुधवार, दिनांक २६ जून, २०२४ | शुक्रवार, दिनांक ३१ मे, २०२४<br>गुरुवार, दिनांक ०६ जून, २०२४<br>गुरुवार, दिनांक १३ जून, २०२४<br>*शुक्रवार, दिनांक २१ जून, २०२४ |
| पाच | (१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री<br>(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(५) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री<br>(६) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री<br>(७) अन्न व औषध प्रशासन मंत्री | } | शुक्रवार, दिनांक १४ जून, २०२४<br>शुक्रवार, दिनांक २१ जून, २०२४<br>शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४<br>*शुक्रवार, दिनांक ०५ जुलै, २०२४ | गुरुवार, दिनांक ०६ जून, २०२४<br>बुधवार, दिनांक १२ जून, २०२४<br>गुरुवार, दिनांक २० जून, २०२४<br>*गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ | सोमवार, दिनांक ०३ जून, २०२४<br>शुक्रवार, दिनांक ०७ जून, २०२४<br>शुक्रवार, दिनांक १४ जून, २०२४<br>*सोमवार, दिनांक २४ जून, २०२४ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक १० जून, २०२४ ते शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून एक आठवडयाच्या जादा प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.